# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
गडचिरोली, दिनांक १८/१०/२०१७

**<u>गडचिरोली जिल्हयातील आठ नक्षलवादी अटकेत व एका नक्षलवादयाचे आत्मसमर्पन</u>**

तालुका भामरागड येथे कोरके नेहा पल्लो, वय-६० वर्ष, अशोक फकिरा सोमनकर, वय- ५५ वर्ष, सुरु छिन्ना पुंगाटी, वय- ६० वर्ष, संतोष नारायण भांडेकर, वय- ३५ वर्ष, बंडू चिन्ना गेडाम, वय- ४५ वर्ष, जोगे जोगी मज्जी, वय- ६५ वर्ष सर्व रा. धोडराज हे ०६ नक्षल समर्थक असून दिनांक १४/१०/२०१७ रोजी उपपोस्टे धोडराज यांनी वरील ०६ नक्षल समर्थकांना अटक केली. मेडपल्ली येथे झालेल्या भुसुरुंग स्फोटात यांचा समावेश होता. तसेच दिनांक १६/१०/२०१७ रोजी भामरागड नक्षल दलम मध्ये कार्यरत असलेला जहाल नक्षल सदस्य रैनु काना पुंगाटी, वय- ३५ वर्षे, रा. गोंगवाडा, ता. भामरागड जि. गडचिरोली याला अटक करण्यात आले. रैनू पुंगाटी हा मागील १० वर्षापासून नक्षल दलममध्ये कार्यरत होता. दलममध्ये कार्यरत असतांना रैनु पुंगाटी कडून १२ बोअर हत्यार वापरण्यात येत होते. मागील १० वर्षापासून घडणाऱ्या भुसुरुंग स्फोट व इतर अनेक गुन्हयांमध्ये याचा समावेश आहे.

दिनांक १७/१०/२०१७ रोजी सतिश ऊर्फ कोसा आडमे सोडी, जि. सुकमा, (छत्तीसगड) या कंपणी १० मध्ये कार्यरत असलेल्या जहाल नक्षलवादयाने पोमके कोठी येथे आत्मसमर्पन केले. कोसा आडमे सोडी हा अल्पवयीन असतांना नक्षलवादयांनी जबरजस्तीने नक्षलमध्ये भरती केल्याचे विचापुस करतांना सांगण्यात आले.

दिनांक ११/१०/२०१७ रोजी जयलाल ऊर्फ पुसू मट्टामी, वय-२७ वर्ष, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली कंपनी-४ मधील जहाल नक्षलवादी याला गडचिरोली पोलीसांनी नक्षलविरोधी अभियान राबवित असताना अटक केली.

वरील सर्व जहाल नक्षलवादी विविध हिंसक घटना, पोलीस व सामान्य नागरिकांच्या हत्या, भुसूरुंग स्फोट यामध्ये त्यांचा समावेश आहे. या आठवडयामध्ये ०८ नक्षलवादी अटक करण्यात आले असून ०१ नक्षलवादयाने आत्मसमर्पन केल्याने नक्षलवादयांना मोठा हादरा बसला असून गडचिरोली पोलीसांचे मोठे यश मानले जात आहे.